मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत), १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.

**दूरध्वनी क्र.०२२ २२७९३६२७.** Email ID : deske7-mh@mah.gov.in

---

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०/ई-७ दिनांक : ०६ जुन २०२४.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.

विषय : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ७५,००० रिक्त पदे भरण्याबाबत.

संदर्भ : सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र
क्र.लवेसू२०२२/प्र.क्र.५०/कार्या-१२. दि.०६.०६.२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयावरील सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भाधीन दि.०६.०६.२०२४ रोजीचे पत्र यासोबत जोडले आहे. संदर्भाधीत पत्रात नमूद केल्यानुसार आपल्या अधिनस्त जिल्ह्यांतील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, गट-ब (अराजपत्रित) संवर्ग, मंडळ अधिकारी, तलाठी,कोतवाल,अव्वल कारकून, महसूल सहायक, लघुटंकलेखक, वाहनचालक, गट-क संवर्ग व शिपाई, गट-ड संवर्गाची विहित विवरणपत्रातील माहिती आजच ०४.०० वाजेपर्यंत निश्चितपणे सादर करावी, ही विनंती.

आपली,

शीमाने
६.६.२०२४

( शीतल माने )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र - वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन

महत्वाचे/तात्काळ

क्रमांक:- लवेसू२०२२/प्र.क्र.५०/कार्या-१२
सामान्य प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६.०६.२०२४

प्रति,
सर्व सह सचिव/उप सचिव
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

विषय : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ७५,००० रिक्त पदे भरण्याबाबत.
आपल्या विभागामार्फत पदभरतीबाबत केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती देण्याबाबत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, राज्यातील ७५ हजार पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागामार्फत पदभरतीच्या कार्यवाहीची खालीलप्रमाणे सद्यस्थिती उद्या शुक्रवार दि. ०७.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करावी. ही विनंती.

ज्या विभागांची माहिती उद्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्राप्त होणार नाही. त्यांनी अ.मु.स. (सेवा) यांच्या दालनात दु. ०३.०० होणाऱ्या बैठकीत माहितीसह हजर रहावे.

१) ऑगस्ट- २०२३ ते मे, २०२४ अखेपर्यंत नियुक्ती आदेश दिलेल्या पदांची संख्या
२) परीक्षेचा निकाल लागला असून नियुक्ती पूर्वी कागदपत्रे तपासण्याची कार्यवाही सुरू असलेल्या पदांची संख्या
३) कंपनी बरोबर करारनाम्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे पण अद्याप परीक्षेचा निकाल लागलेला नाही, अशा पदांची संख्या

आपली,

( गीता रा. कुलकर्णी )
सह सचिव (सेवा)

टीप :- या कार्यासनाकडे फेब्रुवारी- २०२४ पर्यंतची सर्व विभागांच्या पदभरतीची प्राप्त झालेली आकडेवारी तपासून त्या आधारे अद्ययावत माहिती सादर करणे सूलभ होणार असल्याने, कृपया आपल्या कार्यासनातील कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी यांना सह सचिव/कार्या-१२ यांच्या दालनात हे पत्र प्राप्त होताच यापूर्वीची आकडेवारी तपासण्यासाठी त्वरीत पाठवावे, ही विनंती.

प्रत माहितीस्तव :
अ.मु.स.सेवा यांचे स्वीय सहायक

Scanned with OKEN Scanner